सकाळ

# लोकशाही संवर्धनाची प्रत्येकाची जबाबदारी

## निवडणूक आयुक्त सहारिया ; शिवाजी विद्यापीठात राज्यशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय परिषद

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ५ : लोकशाही जिवंत ठेवून तिचे जतन, संवर्धन व संरक्षण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाची जबाबदारी महत्त्वपूर्ण आहे. सर्वांना समान संधी मिळण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न व जनजागृती केल्यास देशाचे लोकशाहीचे स्वप्न सत्यात उतरेल, असे प्रतिपादन राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त जे. एस. सहारिया यांनी आज येथे केले.**

शिवाजी विद्यापीठातील नेहरू अभ्यास केंद्र, राज्यशास्त्र अधिविभागातर्फे व राज्य निवडणूक आयोगाच्या इन्स्टिट्यूट ऑफ डेमॉक्रसी अँड इलेक्शन फॉर गुड गव्हर्नन्सतर्फे 'भारतीय लोकशाहीची वाटचाल' (१९५०-२०१९) विषयावर आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. मानव्यशास्त्र सभागृहात त्याचे आयोजन केले होते.

डॉ. सहारिया म्हणाले, "१९५० नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अपेक्षेप्रमाणे होत नव्हत्या. काही राज्यांत निवडणुका झाल्याच नाहीत. 'सिलेक्टेड' लोकांनाच मतदानाचा अधिकार होता. त्यामुळे १९९२ ला राज्यघटनेत दुरुस्ती केली. स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा देऊन त्यात तीस टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या. स्थानिक संस्थांसाठी स्वतंत्र निवडणूक आयोगाची स्थापना केली. अठरा वर्षांवरील सर्वांना मतदानाचा अधिकाराचा निर्णय 'लॅन्डमार्क' ठरला. ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे सर्व लोक एका स्तरावर आले."



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'भारतीय लोकशाहीची वाटचाल' या विषयावरील परिषदेत बोलताना राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त जे. एस. सहारिया. शेजारी डावीकडून डॉ. प्रल्हाद माने, प्रा. डॉ. प्रकाश पवार, डॉ. मृदुल निळे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. रवींद्र भणगे, जगदीश मोरे.

ते म्हणाले, "इकॉनॉमिक इंटेलिजन्स युनिटच्या सर्वेक्षणात भारत ३८-३९ व्या स्थानावर आहे. स्थानिक स्तरावरील लोकशाही व निर्णयक्षमता कमकुवत असल्याचे हे उदाहरण आहे. पहिल्या दहामध्ये आपला देश असणे आवश्यक आहे. आजघडीला राज्याची लोकसंख्या साडेअकरा कोटी असून अठरा वर्षे पूर्ण केलेल्या युवकांची संख्या सव्वा कोटी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांतून तीन लाखापेक्षा जास्त उमेदवारांना निवडून दिले जाते. त्यामुळे या संस्थांच्या निवडणुका निर्भयमुक्त व पारदर्शक करण्याचे आव्हान आहे."

पुण्यातील हॉटेल असोसिएशनने मतदान केलेल्या नागरिकांना दहा टक्के सूट देण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. शिंदे यांनी, सोशल मीडियावरील जोश मतदानात दिसायला हवा. सर्वसमावेशकता हा लोकशाहीचा मूळ गाभा असून, मतदानावेळी विवेक महत्त्वाचा आहे, असे सांगितले.

प्रा. डॉ. मृदुल निळे, जगदीश मोरे उपस्थित होते. प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. रवींद्र भणगे यांनी आभार मानले.

### डॉ. सहारिया म्हणतात..

- स्थानिक संस्था निवडणुकांत हिंसक घटना नाही
- दुर्गम भागातील उमेदवारांची नामनिर्देशन व शपथपत्र ऑनलाईन
- उमेदवारांचे अर्ज अपात्र होण्यात घट
- नव मतदार नोंदीसाठी विद्यापीठ प्रवेश प्रक्रियेत व्होटर आयडीमध्ये नोंदणी
- प्रत्येक कॉलेजमध्ये नोडल ऑफिसर

Kolhapur, Kolhapur-Today
06/03/2019 Page No. 2

# मतदान अधिकाराला कर्तव्य माना

## राज्य निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया यांचे आवाहन

कोल्हापूर टाइम्स टीम



‘लोकशाही ही आपल्या देशाची फार मोठी ताकद आहे. मात्र या लोकशाहीने दिलेल्या मतदानाच्या अधिकाराबाबत अद्यापही जबाबदारीची जाणीव पूर्णपणे नाही. मतदानादिवशी सुटी साजरी करण्याची मानसिकता लोकशाहीसाठी धोकादायक आहे. या परिस्थितीत बदल होण्यासाठी लोकशाहीचे जतन, संवर्धन व संरक्षण करणे आवश्यक आहे. यासाठी मतदानाचा अधिकार हे सामाजिक कर्तव्य मानले पाहिजे,' असे प्रतिपादन राज्य निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त जे. एस. सहारिया यांनी केले.

नेहरू अभ्यास केंद्र व शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाच्यावतीने भारतीय लोकशाहीची वाटचाल या विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. मानव्यशास्त्र विभागाच्या सभागृहात मंगळवारी हे चर्चासत्र झाले.

तीन लाखांपेक्षा जास्त उमेदवारांना निवडणुकीत दर पाच वर्षांनी निवडून दिले जाते. या प्रक्रियेत ३० लाख उमेदवार निवडणूक लढवितात. ही सर्व प्रक्रिया निवडणूक आयोग पार पाडते.'

ते पुढे म्हणाले,' लोकशाहीची ही प्रक्रिया पारदर्शी होण्यासाठी अनेक उपक्रम राबवण्यात आले. तसेच मतदान जागृती केल्यामुळे मतदानात ११ टक्के वाढ झाली आहे. उमेदवाराबाबत सर्व माहिती लोकांना समजावी यासाठी मतदान केंद्र आवारात फलक उभारण्यात येतात. त्यामुळे उमेदवाराचे शिक्षण, मालमत्ता, चारित्र्य याची माहिती मिळाल्याने मतदार साक्षरतेला प्रोत्साहन मिळते. या प्रक्रियेत लोकांचा सहभागही महत्त्वाचा आहे. त्यासाठी मतदानाच्या हक्काविषयी जाणीवजागृती झाली पाहिजे. समान संधी व समान अधिकार हे लोकशाहीचे तत्त्व समाजातील श्रीमंतापासून गरीबांपर्यंत पोहोचले पाहिजे. मतदानाला बगल देत सहलीला जाणाऱ्यांमध्ये श्रीमंतांची संख्या जास्त आहे. तर मतदान हक्काबाबत जागृती नसल्याने मतदानाकडे पाठ फिरवणाऱ्यांमध्ये गरीबांची संख्या जास्त आहे. ही दरी भरून काढण्याची गरज आहे.'

कुलगुरु डॉ देवानंद शिंदे म्हणाले, ‘शिवाजी विद्यापीठाने मतदार नोंदणी आणि जनजागृती अभियानात चांगली कामगिरी केली आहे. मतदार वाढले म्हणजे लोकशाही यशस्वी झाली नाही असे नाही तर लोकशाही समृद्ध करण्यासाठी प्रबोधनपर प्रयत्न झाले पाहिजेत. मतदान हे लोकशाहीचे सर्वोच्च कर्तव्य आहे ते प्रत्येकाने बजावले पाहिजे. लोकशाहीच्या अधिकाराचा वापर हा या प्रक्रियेत व्हावा.' यावेळी डॉ. प्रकाश पवार, डॉ. रवींद्र भणगे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी परिचय दिला.

### २०० पक्षांची नोंदणी रद्द

सन २०१४ मध्ये आयोगाकडे ४५० नोंदणीकृत पक्ष होते. पक्षांनी किमान वार्षिक ताळेबंदाची माहिती तसेच आयकर विवरण आयोगाकडे नियमित सादर करणे आवश्यक असते. माहिती सादर न करणाऱ्या सुमारे २२० पक्षांची नोंदणी आयोगाने रद्द केली. यामुळे केवळ उमेदवार उभे करून व माघार घेऊन नको त्या बाबी करण्याच्या प्रवृत्तीला आळा बसला, अशी माहिती सहारिया यांनी सांगितली.

# तरुणांनी लोकशाहीचा दूत म्हणून काम करावे

## निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

लोकशाही टिकविण्याची प्रत्येक माणसाची जबाबदारी आहे. लोकशाहीचे जतन, संवर्धन आणि संरक्षण करून सर्वांना समान संधी प्राप्त करून देण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे. विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या तरुणांनी ही जबाबदारी स्वीकारून लोकशाहीचा दूत म्हणून काम करावे, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त जे. एस. सहारिया यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे नेहरू अभ्यास केंद्र, राज्यशास्त्र अधिविभाग आणि राज्य निवडणूक आयोगाची इन्स्टिट्यूट ऑफ डेमोक्रसी अॅन्ड इलेक्शन फॉर गुड गव्हर्नन्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय लोकशाहीची वाटचाल १९५०-२०१९' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र मंगळवारी विद्यापीठाच्या मानव्य विद्या सभागृहात झाले. चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभाचे बीजभाषक म्हणून सहारिया बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

आयुक्त सहारिया म्हणाले, सर्वांना समान संधी आणि सर्वांना एकसमान वागणूक, यासाठी लोकशाही आग्रही असते. लोकशाहीत सुशासनाच्या प्रस्थापनेसाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे अपेक्षित असते. वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने लोकशाहीत विचारमंथन व प्रयत्न अपेक्षित असतात. त्यासाठी सातत्याने शिक्षण, प्रयत्न आणि जागृती या त्रिसूत्रीचा आधार घेऊन लोकशाहीला पुढे घेऊन जाणे महत्त्वाचे आहे.

लोकसभा व विधानसभा यांच्या निवडणुका ही जशी केंद्रीय निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे, त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ही राज्य निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. महाराष्ट्रापुरता विचार करावयाची झाल्यास इथे लोकसभेच्या ४८, विधानसभेच्या २८८, तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तीन लाखांहून अधिक जागा आहेत आणि या तीन लाख जागांसाठी सुमारे तीस लाख उमेदवार उभे रहात असतात. या आकडेवारीवरून राज्य निवडणूक आयोगावरील जबाबदारीची जाणीव होऊ शकेल. मुक्त, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात निवडणुका पार पाडणे ही आयोगाची महत्त्वाची जबाबदारी आहे. त्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने अनेक अभिनव उपक्रम राबविलेले आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावर अत्यल्प संशोधन होते, ही बाब लक्षात आल्यानंतर विद्यापीठांना आवाहन करून यासंदर्भातील संशोधनाला चालना देऊन नवीन ज्ञाननिर्मितीला प्रोत्साहन देण्याचे धोरण आयोगाने स्वीकारले. त्याचप्रमाणे नवमतदार नोंदणीच्या कामातही विद्यापीठे, महाविद्यालये आदी शिक्षण संस्थांचे सहकार्य लाभत आहे. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'लोकशाही, निवडणुका व सुशासन' हा एक सक्तीचा विषय करण्याबरोबरच नजीकच्या स्थानिक स्वराज्य संस्थेला सक्तीची भेट या गोष्टीही आयोगाने विद्यापीठांच्या सहकार्याने राबविल्या आहेत.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, सर्वसमावेशकता हा लोकशाहीचा गाभा आहे. योग्य उमेदवार निवडण्यासाठी लोकशाहीच्या पद्धतीपेक्षा लोकशाहीचा संस्कार महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे या प्रक्रियेत लोकसहभाग ही महत्त्वाची बाब आहे. शिवाजी विद्यापीठ निवडणूकविषयक जागृती, नवमतदार नोंदणी आणि लोकशाहीविषयक अभ्यासक्रम आदी उपक्रमांकडे लोक चळवळ म्हणून पाहात आहेत.

प्रारंभी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस मान्यवरांनी अभिवादन केले. सहारिया यांच्या हस्ते रोपट्यास पाणी घालून चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात आले. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. नोडल ऑफिसर डॉ. प्रल्हाद माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. रवींद्र भणगे यांनी आभार मानले.

यावेळी मुंबई विद्यापीठाचे डॉ. मृदुल निळे, आयोगाचे जनसंपर्क अधिकारी जगदीश मोरे प्रमुख उपस्थित होते.

### दोनशे वीस पक्षांची नोंदणी रद्द

२०१४ मध्ये आयोगाकडे ४५० नोंदणीकृत पक्ष होते. खोलात जाऊन त्यांची माहिती घेतली असता आयोगाच्या मूलभूत नियमांचेही त्यांनी पालन केल्याचे दिसले नाही. पक्षांनी किमान वार्षिक ताळेबंदाची माहिती तसेच आयकर विवरण आयोगाकडे नियमित सादर करणे आवश्यक असते. वेळोवेळी सूचना देऊनही ही माहिती सादर न करणाऱ्या सुमारे २२० पक्षांची नोंदणी आयोगाने रद्दबातल ठरविली.




**कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठात आयोजित 'भारतीय लोकशाहीची वाटचाल' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात बीजभाषण करताना राज्य निवडणूक आयुक्त जे.एस. सहारिया. व्यासपीठावर डॉ. प्रल्हाद माने, प्रकाश पवार, मृदुल निळे, कुलगुरू देवानंद शिंदे, रवींद्र भणगे, जगदीश मोरे.**

लोकमत

## जे. एस. सहारिया : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय चर्चासत्र

# लोकशाहीत वंचितांना स्थान हवे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सर्वांना समान संधी, एकसमान वागणुकीसाठी लोकशाही आग्रही असते. वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्याच्यादृष्टीने लोकशाहीत विचारमंथन आणि प्रयत्न होणे अपेक्षित असते; त्यासाठी सातत्याने शिक्षण, प्रयत्न, जागृती या त्रिसूत्रीचा आधार घेऊन लोकशाहीला पुढे घेऊन जाणे महत्त्वाचे ठरणारे आहे, असे प्रतिपादन राज्य निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया यांनी मंगळवारी केले.

शिवाजी विद्यापीठातील नेहरू अभ्यास केंद्र, राज्यशास्त्र अधिविभाग आणि राज्य निवडणूक आयोगाच्या इन्स्टिट्यूट ऑफ डेमॉक्रेसी अ‍ॅन्ड इलेक्शन फॉर गुड गव्हर्नन्सतर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी त्यांचे बीजभाषण झाले. 'भारतीय लोकशाहीची वाटचाल (१९५०-२०१९)' असा चर्चासत्राचा विषय होता. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

राज्य निवडणूक आयुक्त सहारिया म्हणाले, लोकसभा, विधानसभा निवडणुका ही केंद्रीय निवडणूक आयोगाची, तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ही राज्य निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. मुक्त, निर्भय, पारदर्शक वातावरणात निवडणुका पार पाडणे ही राज्य आयोगाची महत्त्वाची जबाबदारी आहे. त्यादृष्टीने आयोगाने विविध अभिनव उपक्रम राबविले आहेत. त्यामध्ये नामनिर्देशन, शपथपत्रांचे सादरीकरण १०० टक्के ऑनलाईन स्वरुपात करवून घेणारे महाराष्ट्र हे देशातले एकमेव राज्य आहे. लोकशाही ही निरंतर प्रक्रिया आहे. लोकशाहीचे संरक्षण, संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, सर्वसमावेशकता हा लोकशाहीचा गाभा आहे. योग्य उमेदवार निवडण्यासाठी लोकशाहीचा संस्कार महत्वाचा ठरतो. डॉ. शिंदे म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठ निवडणूकविषयक जागृती, नवमतदार नोंदणी, लोकशाहीविषयक अभ्यासक्रम, आदी उपक्रमांकडे लोकचळवळ म्हणून पाहते. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. नोडल ऑफिसर डॉ. प्रल्हाद माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. पूनम जाधव, पूजा शिंगाडे यांनी सूत्रसंचालन केले. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. रवींद्र भणगे यांनी आभार मानले.



कोल्हापुरात मंगळवारी शिवाजी विद्यापीठात झालेल्या 'भारतीय लोकशाहीची वाटचाल' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात राज्य निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया यांचे बीजभाषण झाले. यावेळी डावीकडून प्रल्हाद माने, प्रकाश पवार, मृदुल निळे, देवानंद शिंदे, रवींद्र भणगे, जगदीश मोरे उपस्थित होते.

## लोकशाही सुदृढ होण्यासाठी चर्चा आवश्यक

मतदान करणे बंधनकारक असलेल्या जगभरातील विविध देशांच्या तुलनेत भारतात होणाऱ्या मतदानाची टक्केवारी चांगली आहे. आपल्याकडे ग्रामीण भागात चांगले मतदान होते; त्यामुळे मतदान होत नाही असे म्हणणे चुकीचे आहे. सोशल मीडियावर कोणाचेही नियंत्रण नाही. या मीडियाची विश्वासार्हता वेगाने कमी झाली आहे. पारंपरिक माध्यमांची भूमिका सामाजिक शिक्षण, सुरक्षेची आहे. प्रत्येक मतदाराने सजग होऊन मतदान केले पाहिजे. सर्वांचे म्हणणे ऐकून, विचार करुन मतदारांनी निर्णय घ्यावा. कोणत्याही अमिषाला बळी पडू नये. त्यादृष्टीने लोकशिक्षण समृद्ध झाले, तरच लोकशाही सक्षम होईल, असे 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले म्हणाले.

## ऊसतोड कामगारांचा विचार व्हावा

मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाला समाजातील विविध घटकांच्या सहकार्याची गरज आहे. माथेरान हॉटेल असोसिएशन, पुणे टॅक्सी असोसिएशन काही योजना राबवून सहकार्य केले. त्या धर्तीवर कल्पक योजना विविध शहरांमध्ये राबविणे आवश्यक असल्याचे सहारिया यांनी सांगितले. ते म्हणाले, कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी त्यांच्याकडे येणाऱ्या ऊसतोड कामगारांची मतदारनोंदणी करण्याची जबाबदारी पार पाडावी. तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्यासाठी मतदानाचे स्वतंत्र केंद्र सुरु करावे.

## ३ लाख जागांसाठी ३० लाख उमेदवार

महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८, विधानसभेच्या २८८, तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तीन लाखांहून अधिक जागा आहेत. या तीन लाख जागांसाठी सुमारे ३० लाख उमेदवार उभे राहत असतात. या आकडेवारीवरुन राज्य निवडणूक आयोगावरील जबाबदारीची जाणीव होऊ शकेल, असे सहारिया यांनी सांगितले.

पुढारी

# निर्भय, पारदर्शी निवडणुका मोठे आव्हान

## राज्य निवडणूक आयुक्त सहारिया; शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय लोकशाही एका इंग्लंडमधील संस्थेच्या क्रमवारीत फारच मागे आहे. देशातील सर्वात मोठ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत जागरुकता नाही. निर्भय, मुक्त, पारदर्शी निवडणुका घेणे मोठे आव्हान आहे. लोकशाही व्यवस्थेत सुधारणा करण्याची गरज आहे. लोकशाही बळकट करणे, तिचे संरक्षण व संवर्धन ही सरकार, विद्यापीठे, निवडणूक आयोगाची नव्हे तर प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन राज्य निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ नेहरू अभ्यास केंद्र, राज्यशास्त्र अधिविभाग व राज्य निवडणूक आयोगाची 'इन्स्टिट्यूट ऑफ डेमोक्रसी अँड इलेक्शन फॉर गुड गव्हर्नन्स' यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय लोकशाहीची वाटचाल (१९५०-२०१९)' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभाचे बीजभाषक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. यावेळी मुंबई विद्यापीठाचे डॉ. मृदुल निळे, आयोगाचे जनसंपर्क अधिकारी जगदीश मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आयुक्त सहारिया म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अपेक्षितपणे होत नसल्याचे दिसून आले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना संवैधानिक दर्जा, महिलांना ३३ टक्के आरक्षण, निवडणुकांसाठी स्वतंत्र आयोग व त्यांच्याकडे संपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली. नामनिर्देशन व शपथपत्रांचे सादरीकरण शंभर टक्के ऑनलाइन स्वरूपात करणारे महाराष्ट्र एकमेव राज्य आहे. यामुळे उमेदवारांना त्यांच्या सोयीच्या वेळेनुसार अर्ज करता येऊ शकले व अर्ज बाद होण्याचे प्रमाण कमी झाले.



सहारिया म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावर अत्यल्प संशोधन होते. हे लक्षात आल्यानंतर विद्यापीठांना यासंदर्भातील संशोधनाला चालना देऊन नवीन ज्ञाननिर्मितीला प्रोत्साहन देण्याचे धोरण आयोगाने स्वीकारले. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'लोकशाही, निवडणुका व सुशासन' हा एक सक्तीचा विषय करण्याबरोबरच नजीकच्या स्थानिक स्वराज्य संस्थेला सक्तीची भेट या गोष्टीही आयोगाने विद्यापीठांच्या सहकार्याने राबविल्या आहेत.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, सर्वसमावेशकता हा लोकशाहीचा गाभा आहे. योग्य उमेदवार निवडण्यासाठी लोकशाहीचा संस्कार महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे या प्रक्रियेत लोकसहभाग ही महत्त्वाची बाब आहे. मतदान हे सर्वोच्च कर्तव्य असले तरी मतदार वाढले म्हणजे लोकशाही समृद्ध झाली, असे नव्हे तर त्यासाठी लोकशाहीविषयक जाणिवा प्रगल्भ होण्याची गरज आहे. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. नोडल ऑफिसर डॉ. प्रल्हाद माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. रवींद्र भणगे यांनी आभार मानले.

### २२० पक्षांची नोंदणी आयोगाकडून रद्द

२०१४ मध्ये आयोगाकडे ४५० नोंदणीकृत पक्ष होते. आयोगाच्या मूलभूत नियमांचे त्यांनी पालन केल्याचे दिसून आले. पक्षांनी किमान वार्षिक ताळेबंदाची माहिती व आयकर विवरण आयोगाकडे नियमित सादर करणे आवश्यक असते. वेळोवेळी सूचना देऊनही माहिती सादर न करणाऱ्या २२० पक्षांची नोंदणी आयोगाने रद्दबातल ठरविली. यामुळे निवडणूक काळातील गैरप्रवृत्तीला आळा बसल्याचे आयुक्त सहारिया म्हणाले.

### ...त्यामुळेच योग्य उमेदवार निवडण्याची संधी

मतदारांना मतदारसंघातील उमेदवारांची माहिती होण्यासाठी उमेदवारांनी दाखल केलेल्या शपथपत्रांतील माहितीचे मोठे फ्लेक्स मतदारसंघाबाहेर तसेच शहरातील चौकांत लावण्यात येतात. यावर उमेदवाराचे शिक्षण, त्याच्या स्थावर व जंगम मालमत्तेचे विवरण, त्याच्यावरील गुन्ह्यांची नोंद यांची माहिती दिली जाते. यामुळे मतदारांना योग्य उमेदवार निवडण्याची संधी मिळाल्याचे आयुक्त साहारिया यांनी सांगितले.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहातर्फे आयोजित "होस्टेल डे''''च्या समारोपप्रसंगी उपस्थित कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

# मुलींचे स्वतंत्र वसतिगृह बांधणार : डॉ. शिंदे

## 'होस्टेल डे' कार्यक्रमात माहिती, ५० मुलींची सोय

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर ता. ५ : येत्या शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठात पन्नास मुलींची राहण्याची सोय असलेले स्वतंत्र वसतिगृह बांधण्यात येणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली. विद्यापीठात होस्टेल डेच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. होस्टेल डेनिमित्त झालेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण त्यांच्या हस्ते झाले. चिफ रेक्टर डॉ. प्रतिमा पवार अध्यक्षस्थानी होत्या.

डॉ. शिंदे म्हणाले,'मुलींच्या व्यक्तिमत्वासाठी होस्टेलमधील उपक्रम महत्त्वाचे आहेत. प्रत्येक मुलगी एक विश्व आहे. अनेक विश्व जवळ आले की, एक ऊर्जा निर्माण होते. आयुष्यात नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. साथीदार आणि जोडीदार यातील फरक समजून घ्या. कला क्रीडा कौशल्य हे उत्तम साथीदार असतात, तर होणारा पती हा जोडीदार असतो.'

ते म्हणाले, 'सध्याचे युग हे डिजिटल युग आहे. तंत्रज्ञान आणि संस्कार अवगत करा. स्त्री सक्षमीकरणासाठी प्रत्येक स्त्रीला विचारांचे स्वातंत्र्य देणे महत्त्वाचे आहे. निर्णय प्रक्रियेत स्त्रीचा सहभाग महत्वाचा आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या निर्णय प्रक्रियेत स्त्रियांना प्राधान्य देण्यात आले आहे.' वाळवेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पवार यांनी अहवाल वाचन केले.

यावेळी होस्टेलमधील कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. सर्वाधिक स्पर्धेत भाग घेऊन यश मिळवणारी स्नेहलता पाटील हिला 'होस्टेल क्वीन'चा किताब देण्यात आला.

### स्पर्धेतील विजेत्या खेळाडू

खो-खो - प्रियांका भिसे, धावणे- हर्षदा बोल्ले फुगडी- प्रांजल माने. संगीत खुर्ची- सुप्रिया माळी, वक्तृत्व - स्नेहलता पाटील, एकांकिका -प्रज्ञा जाधव, फॅशन शो - तृप्ती भोसले, सोलो नृत्य -तेजस्विनी घोरपडे, ग्रुप डान्स - पूजा पाटील ग्रुप, केशरचना- पूजा पाटील, रांगोळी- स्नेहलता पाटील, कबड्डी- हर्षदा बोल्ले, क्विज - प्रियांका थोरात, मेहंदी- पूनम कोरे, निबंध- नीलिमा पाटील, बॅडमिंटन- हर्षदा चोथे, गायन- मुक्ता कांबळे, काव्य वाचन- ज्योती सुर्वे.



डॉ. राजन गवस  डॉ. अरुण भोसले

# डॉ. गवस, डॉ. भोसले 'विश्वकोश'वर

कोल्हापूर : महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सदस्यपदी शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस आणि इतिहास विभागप्रमुख डॉ. अरुण भोसले यांची निवड करण्यात आली. राज्य सरकारने मंगळवारी दिलीप करंबेळकर यांच्या अध्यक्षतेखाली ३१ सदस्यांची यादी मंगळवारी जाहीर केली. डॉ. गवस यांची 'चौंडकं', 'भंडारभोग', 'तणकट', 'ब बळीचा', 'कळप' आदी कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

इतिहास विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. अरुण भोसले यांनी 'सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास' या विषयावर संशोधन करून शिवाजी विद्यापीठातील इतिहास विषयातील पहिली पीएचडी मिळविली. आधुनिक भारत हा त्यांच्या अभ्यासाचा विषय आहे.

पुढारी

# शोधप्रबंध आता 'शोधगंगा'वर

## विद्यापीठात बॅ. खर्डेकर केंद्राची कामगिरी; आज लोकार्पण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठास सादर करण्यात आलेले २०१८ अखेरपर्यंतचे ३,४९६ शोधप्रबंध इनफ्लिबनेटच्या 'शोधगंगा' या राष्ट्रीय संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहेत. या उपक्रमामुळे विद्यापीठाकडील संशोधकीय ज्ञान जगभरातील संशोधकांना आता खुले होणार आहे.

विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राकडे उपलब्ध १९६४ ते २०१८ पर्यंतच्या ३,४९६ पीएच.डी. प्रबंधांचे डिजिटायझेशन करून ते इनफ्लिबनेटच्या 'शोधगंगा' (shodhganga.inflibnet.ac.in) या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आले आहे. विद्यापीठातील संशोधन संशोधक, अभ्यासकांना उपयोगी पडावे, या हेतूने विद्यापीठाने अहमदाबादच्या इनफ्लिबनेट सेंटरशी सामंजस्य करार केला. त्याअनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाकडून २०१२ मध्ये विद्यापीठाच्या डिजिटायझेशन प्रकल्पासाठी १९ लाख रुपयांचे अनुदान मिळाले. 'शोधगंगा' या संकेतस्थळावर प्रबंध विषयनिहाय पाहणे, वाचणे, डाऊनलोड करून घेणे आदी सुविधा ज्ञानस्रोत केंद्राच्या संदर्भ विभागाद्वारे उपलब्ध




> विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्राने इनफ्लिबनेटच्या 'शोधगंगा' पोर्टलवर १९६४ ते २०१८ पर्यंतचे ३,४९६ पीएच.डी.चे शोधप्रबंध अपलोड केले आहेत. विद्यापीठात गेल्या ५५ वर्षांत विविध विषयांवर मौलिक संशोधन झाले आहे. राज्यात अशा प्रकारे सर्व शोधप्रबंध अपलोड करणारे शिवाजी विद्यापीठ तिसरे आहे.
> - **डॉ. देवानंद शिंदे,** कुलगुरू

करून देण्यात आल्या आहेत.

डिजिटायझेशनचे काम गुरगावच्या 'प्रो-क्वेस्ट' या शिखर संस्थेकडे सोपविण्यात आले **पान ४ वर**

पुढारी

# शोधप्रबंध आता ‘शोधगंगा’वर

(पान १ वरून) होते. त्यांच्यामार्फत ज्ञानस्रोत केंद्राकडे उपलब्ध विविध विषयांच्या पीएच. डी. प्रबंधांचे संपूर्ण स्कॅनिंग व इतर अनुषंगिक तांत्रिक कामे करून हे सर्व प्रबंध ‘शोधगंगा’ या राष्ट्रीय रिपॉझिटरी पोर्टलवर उपलब्ध केले आहेत, अशी माहिती ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी दिली.

दरम्यान, बुधवारी (दि. ६) ज्ञानस्रोत केंद्रातर्फे आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेत ‘शोधगंगा’वर अपलोड करण्यात आलेल्या प्रबंधांचे औपचारिक लोकार्पण करण्यात येणार आहे. यावेळी प्रो-क्वेस्ट कंपनीचे प्रताप दास, आनंदिता सेनगुप्ता व सचिन मोरे उपस्थित राहणार आहेत.